## "जिल्हा रस्ता सुरक्षा समिती"
## मा.विभागीय आयुक्त कार्यालय,
## विधानभवन सभागृह, पुणे
## बैठक दिनांक २९.०८.२०१८ वेळ दुपारी ०४.०० वाजता
## विषय सूची

**विषय क्र. (१) : मागील बैठक दिनांक १८.०४.२०१८ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**विषय क्र. (२) : जिल्हा रस्ता सुरक्षा समितीमध्ये अशासकीय सदस्यांची नियुक्ती.**

मा.अध्यक्ष यांनी नामनिर्देशीत केलेल्या खालील २ अशासकीय सदस्यांची समितीमध्ये नियुक्ती करणे.

१) श्री.रणजित गाडगीळ, परिसर संरक्षण संवर्धन संस्था, पुणे

२) श्री.धनंजय विनोद वाठारकर, संस्थापक अध्यक्ष, ग्राहक सेवा संस्था महाराष्ट्र राज्य.

**विषय क्र. (३) : पुणे-पिंपरी-चिंचवड शहर व पुणे ग्रामीण भागातील वाहतूकीची समस्या गंभीर होत असल्याबाबत.**

- पुणे, पिंपरी-चिंचवड शहर तसेच पुणे ग्रामीण भागामधील वाहतूकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. वाढते शहरीकरण, वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या व अपुरे रस्ते या बाबींचा विचार केला असता, पुणे शहर व ग्रामीण भागामध्ये नियमितपणे रस्त्यावर वाहतूक कोंडी होत असते. परिणामी इच्छित ठिकाणी पोहोचण्यास विलंब होऊन आवश्यकतेपेक्षा जास्त इंधनाचा वापर होत आहे. त्यामुळे वायुप्रदुषण वाढून आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. तसेच पुणे जिल्ह्यात मुंबई, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, सातारा या जिल्ह्यांना जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गांचा समावेश आहे. सदर महामार्गांवर व त्याचप्रमाणे इतर राज्य मार्गांवर मोठ्या प्रमाणावर अपघात होत आहेत.

**कारणे :**

- पुणे जिल्ह्यात दररोज सरासरी नोंद होणारी १००० वाहने.
- रस्त्यांच्या विस्तारीकरणास मर्यादा.
- अनियंत्रित पार्किंग
- अतिक्रमणे
- रस्त्यांची दुरावस्था
- नागरीकांमध्ये वाहतूक शिस्तीचा अभाव.
- वाहतूक नियंत्रणाकरिता उपलब्ध असलेले अपुरे मनुष्यबळ
- महामेट्रो व बीआरटी प्रकल्प

| मागील चार वर्षातील पुणे जिल्ह्यातील अपघातांचा गोषवारा | | | |
|---|---|---|---|
| **वर्ष** | **अपघात** | **मृत** | **जखमी** |
| २०१५ | ४०७८ | १५४३ | ३३४८ |
| २०१६ | ३७३७ | १४७१ | २९५३ |
| २०१७ | ३९७५ | १३९८ | ३२८१ |
| जुलै २०१८ अखेर | २२६१ | ८९५ | १८३६ |
| **एकुण** | **१४०५१** | **५३०७** | **११४१८** |

यासाठी सार्वजनिक वाहतूकीचे सक्षमीकरण करणे. शहरांतर्गत अपुर्ण अवस्थेतील बीआरटी योजना लवकरात लवकर कार्यान्वीत करणे. मेट्रो प्रकल्प कार्यान्वीत होण्यासाठी संबंधीत कामे युध्दपातळीवर राबवणे. बहुमजली पार्किंग उभारणे, रस्त्यावरील पार्किंग कमी करणे. पुणे शहराभोवती तसेच महत्वाच्या ठिकाणी रिंगरोडचे जाळे निर्माण करणे. 'कार पुल' संकल्पनेचा वापर करणे यासारख्या उपाययोजनांबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

**विषय क्र. (४) : पुणे-सातारा महामार्गाची सद्यस्थिती.**

- सदर महामार्गावरील ५ – ६ ठिकाणच्या उड्डाणपुलांचे काम ठप्प आहे.
- सेवा रस्त्यांवर प्रचंड प्रमाणावर खड्डे निर्माण झालेले आहेत, त्यांची दुरुस्ती होत नाही.
- वाहतूक कोंडीचा नागरीकांना तसेच वाहतूक पोलीसांना प्रचंड मनःस्ताप होत आहे.
- गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तातडीने ठोस कार्यवाही होण्याची आवश्यकता.
- मुलुंड चेकनाका, ऐरोली चेकनाका येथे टोलमाफी दिलेली आहे. त्याप्रमाणे खेड-शिवापूर टोलनाक्यावर देता येऊ शकेल किंवा कसे?

**विषय क्र. (५) : द्रुतगती महामार्गावरील अपघात कमी होण्याबाबत तसेच उपाययोजना राबविण्याबाबत चर्चा करणे.**

(१) पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गाचे सेफ्टी ऑडीट करण्याबाबत.

(२) नियमित अपघात होणाऱ्या ठिकाणी तात्काळ उपाययोजना करण्याबाबत

(३) पुणे जिल्ह्यातून जाणाऱ्या दृतगती महामार्गावर ज्या ठिकाणी अद्याप कामे सुरु आहेत त्या ठिकाणी आवश्यक असणारे बोर्ड प्रदर्शित करणे.

(४) इंटेलिजंट ट्रॅफिक मॉनिटरिंग सिस्टीम ची अंमलबजावणी सद्यस्थिती.

**विषय क्र. (६) : पुणे जिल्ह्यात महिन्यातील एक दिवस 'नो हॉर्न डे' संकल्पना राबविणे.**

रस्ते अपघातास आळा घालण्यासाठी केंद्र शासन त्याचप्रमाणे राज्य शासनाने परिवहन, पोलीस, आरोग्य, शिक्षण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहकार्याने विविध उपक्रम राबविण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे. सदर अभियानांतर्गत महाराष्ट्र शासनाने ध्वनीप्रदुषण विरोधात विशेष मोहिम राबविण्याचे सुचित केले आहे.

रस्ते अपघातामध्ये मोठ्या संख्येने जिवीतहानी व वित्तहानी होत आहे. मृत्युमुखी पडणाऱ्या व्यक्तींमध्ये तरूण व्यक्तींची संख्या लक्षणीय आहे. बहुसंख्य महाविद्यालयीन युवक व युवती रस्त्यावर वाहने चालवित असतात व भविष्यातील अनेक वर्षे चालविणार आहेत. रस्ते अपघातासोबतच ध्वनीप्रदुषण ही एक मोठी सामाजिक समस्या बनली आहे. **पुणे शहरात दररोज साधारणपणे 'एक कोटी' वेळा हॉर्न वाजविले जातात**. हॉर्नद्वारे होणाऱ्या ध्वनीप्रदुषणाचे निर्मुलन करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई तसेच मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी निर्देश दिलेले आहेत. याकरिता शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रबोधन करणे अत्यंत महत्वाचे आहे. परिवहन विभाग संपूर्ण राज्यात 'हॉर्न नॉट ओके प्लीज' ही संकल्पना राबवित आहे. या उपक्रमांतर्गत हॉर्न वाजविण्याचे दुष्परिणाम व हॉर्न न वाजवता वाहन चालविण्याचे महत्व याबाबत विद्यार्थ्यांमध्ये तसेच नागरीकांमध्ये प्रबोधन करण्यात येणार आहे.

प्रस्तुत उपक्रम यशस्वी होण्यासाठी खालीलप्रमाणे अभियान राबविण्याचे प्रस्तावित आहे.

- विद्यापीठ परिसरात हॉर्न वाजविण्यास मनाई लागू करून शांतता परिसर (सायलेंस झोन) घोषित करणे.
- विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील सर्व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांकरिता प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करणे.
- विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील एनएसएस / एनसीसी इत्यादि विभागातील विद्यार्थ्यांना स्वयंसेवक तयार करणे.
- प्रसिध्दी माध्यमांचे तसेच एफएम रेडीओच्या सहाय्याने अभियान राबविणे.
- लायन्स क्लब, रोटरी क्लब सारख्या सेवाभावी संस्थांचे सहकार्य घेणे.
- शालेय व्यवस्थापनाचे सहाय्य घेणे.
- मान्यवर व्यक्तींच्या मनोगताद्वारे व्हाट्सअॅपच्या माध्यमातून व्यापक प्रसार करणे.
- प्रत्येक महिन्याची १० तारीख **'नो हॉर्न डे'** करिता प्रस्तावीत.

**विषय क्र. (७) : मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयावर चर्चा.**

**सदस्य सचिव**
**जिल्हा रस्ता सुरक्षा समिती तथा**
**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे**